जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/१०/२०२३
## दि.१८/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २१०/२०२३,भादविक ३९२,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३० वर्षे,रा.कात्रज चौक,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा.बुधवार पेठ,पुणे येथील दत्त मंदिराचे बाजुला गल्ली मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामगारां सोबत दुकानात असतांना,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,त्यांचे हातामध्ये लोखंडी हत्यार घेवुन दुकाना मध्ये येवुन, फिर्याद व साक्षीदार यांना शिवीगाळ करून,त्यांना तलवारीचा धाक दाखवुन व जीवे ठार मारण्याची धमकी देवुन जबरदस्तीने त्यांचे व्यवसायाचे गल्ल्यामध्ये हात घालुन,त्यामधील ५,३६०/- रुपये रोख रक्कम जबरी चोरी करून नेली आहे. (फिर्यादी हे त्यांचे मुळगांवी गेल्याने आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, वैभव गायकवाड ९९८७००२७८७ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६१ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१०/२०२३ रोजी १८/१० वा.नवसहयाद्री सोसायटी सोनचाफा पथ,कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे राहते घराजवळ पायी फिरत असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ६०,०००/- रु किंमतीचे सोन्याची चेन रू किमतीची जबरी चोरी करून नेली आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, पवार ०२०/२५४४५००३ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २१३/२०२३,भादविक ३९२,५०६,भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), ४(२५),महा.पोलीस अधी.कलम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३८ वर्षे,रा.सर्वे नं.६७,संतोषनगर,कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०२३ रोजी २१/०० वा.भारत पेट्रोल पंपाचे विरुद्ध बाजुस,छत्रपती शिवाजी महाराज रोड,पुणे मनपा जवळ,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामगारां सोबत नमुद ठिकाणी व्हिडीओ गेम पार्लरचा व्यवसाय करीत असताना,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादीस हत्यारांचा धाक दाखवुन,त्यांचे दुकानातील कॅश काऊंटर मधील ४,०००/- व त्यांचे खिशातील ६००/- रुपये असे एकुण ४,६००/- रुपये रोख रक्कम जबरी चोरी करून नेली आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३८९/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५८ वर्षे,रा.सी टाईप बिल्डींग,११/४,रेजहिल खडकी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/३० वा.ते सकाळी ११/०० वा.चे दरम्यान सी-टाईप बिल्डींग,११/३,रेंजहिल्स खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील चांदीचे दागिने,वापरत्या साडया व चेक बुक असा एकुण २,७००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अर्जुन बेंदगुडे ०२०/२५८१८६५९ |

## २१ ऑक्टोबर पोलीस स्मृतिदिन-२०२३

दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन देशभर पाळला जातो. या दिवशी संपुर्ण वर्षात आपले कर्तव्य बजावत असताना कामी आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस दलातर्फे मानवंदना देऊन श्रध्दांजली वाहण्यात येते. हा दिवस पोलीस दलाला अभिमानाचा,शौर्याला मानवंदना देण्याचा,त्याचबरोबर आपल्या जुन्या सहका-यांच्या स्मृतीने मन हेलावणाराही असतो.

२१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणुन पाळला जाण्यास १९५९ मध्ये लडाख भागातील सरहद्दीवर झालेली घटना कारणीभुत ठरली. भारत चीन सरहद्दीवर लडाख भागात १८ हजार फुट उंचीवर हॉट स्प्रिंग्ज नावाचे ठिकाण आहे. २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी हॉट स्प्रिंग्ज येथे गस्त चालु होती. गस्ती तुकडी नेहमीप्रमाणे गस्त घालण्यासाठी कुच करत हॉट स्प्रिंगच्या पुर्वेला ०६ मैल दुर ती आली असताना पर्वताच्या डाव्या बाजुला तुकडीच्या नेत्याला काही संशयास्पद खुणा दिसल्या. तुकडी त्या खुणांच्या अनुरोधाने पुढे चालु लागली आणि अचानक भयानक गोळीबार सुरू झाला. त्याठिकाणी पोलीस वीरांनी शौर्याने तोंड दिले. ही विशेष लढाई लढता-लढता यापैकी १० गस्ती शिपायांना वीरमरण आले व ९ जण जखमी अवस्थेत शत्रुच्या हाती सापडले. हे १० अमर शिपाई होते पुरणसिंग, धरमसिंग, इंगजित सुबा, नोरबु लामा, शिवनाथ प्रसाद, त्शेरिंग नोरबु, इमामसिंग, सवनसिंग, बेगराज आणि माखनलाल असे होते.

त्यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या छावणीवरही अचानक चिनी सैन्यांनी हल्ला केला होता. या लढाईत कामी आलेल्या या शुर पोलीस जवानांपैकी पश्चिम बंगालचे-३, हरियाणा-२, पंजाब-२, उत्तर प्रदेश-२, हिमाचल प्रदेश-१ असे होते. ही बातमी वा-यासारखी सा-या देशभर पसरली. १३ नोव्हेंबरला चिनी सैनिकांनी या हुतात्म्यांचे मृतदेह भारताच्या ताब्यात दिले. १४ नोव्हेंबरला सकाळी ०८/०० वा. हॉट स्प्रिंग्ज येथे त्यांच्या वर सन्मानपुर्वक अंत्यविधी करण्यात आले. त्यावेळी प्रत्येक राज्यातील पोलीस दलांनी त्या त्या ठिकाणी या वीरांना श्रध्दांजली अर्पण केली.

त्यानंतर पाटणा येथे १९५९ साली झालेल्या अखिल भारतीय पोलीस स्पर्धांच्या वेळी सर्वांनी अशी शपथ घेतली. **'आमच्या हया वीर हुतात्म्यांचे स्मरण आम्ही दरवर्षी २१ ऑक्टॉबरला पोलीस हुतात्मा दिन पाळुन करू'** आणि तेव्हापासुन दरवर्षी हा दिन भारत वर्षात मोठया सन्मानाने **'पोलीस हुतात्मा दिन'** म्हणुन पाळण्यात येतो. राज्या-राज्यातुन पोलीस दले या हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी संचलन आयोजीत करून त्यांना मानवंदना देतात.

**दि.१ सप्टेंबर २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२३** या कालावधीत देशातील सर्व राज्यात पोलीस दलाचे पोलीस जवान (सर्व दर्जाचे) असे एकुण **१८८** जवान यांनी आपले कर्तव्य बजावत असताना देह धारातीर्थी ठेवले. त्यामध्ये महाराष्ट्रातील **१.सहा.पो.निरी.सुदर्शन भिकाजी दातिर २.पो.हवा.गौरव नथुजी खरवडे ३.पो.हवा.जयंत विष्णुजी शेरेकर ४.पो.हवा.विठ्ठल एकनाथ बदने ५.पो.ना.संजय रंगराव नेटके ६.पो.ना.अजय बाजीराव चौधरी** अशा एकुण **०६** पोलीस जवानांचा समावेश आहे.

**मा.वाइस एडमिरल,(अजय कोच्छर),ए.व्हि.एस.एम,एन.एम.कमांडट,नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी,खडकवासला,पुणे** हे वरील हुतात्म्यांना दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे श्रध्दांजली अर्पण करणार आहेत. सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक व इतर वरिष्ठ पोलिस अधिकारी हे हजर राहणार आहेत.

तरी नागरीक व प्रसार माध्यमांना आवाहन करण्यात येते की,पोलीस हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण दिनांक २१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ०७/५० वा.चे पुर्वी पोलीस संशोधन केंद्र,पाषाण रोड,पुणे येथे उपस्थित राहावे.

सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विंनती आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**